Page No.:
Date:
YOUVA

# संत जनाबाई

संत जनाबाईंनी स्वतःला सदैव नामयाची दासी असे म्हटले आहे. मराठवाड्यात परभणी जिल्ह्यातील गंगाखेड या छोट्याशा गावातील 'दमा व करंड' यांची 'जनाबाई' ही मुलगी. दोघेही विठ्ठल भक्त होते. 'दमा' हा पंढरीची वारी करीत असे. एकदा दमाला स्वप्नात पांडुरंगाने दृष्टांत देऊन सांगितले, 'तुला एक मुलगी होईल. ती कृतयुगात पद्मिनी होती, त्रेतायुगात मंथरा होती, द्वापार युगात कुब्जा होती. ही मुलगी मोठी भक्त होईल व तुझ्या कुळाचा उध्दार करील. थोडी मोठी झाल्यावर तिला दामाशेटींकडे पाठव.

त्यावेळी नामदेवांचे वडील दामाशेटी 'रेळेकर' हे नरसी (बामणी) येथे राहत होते. जनी त्यांच्याकडे आली व त्या कुटुंबासोबत दासी म्हणून पंढरपूरला आली. १५ माणसांच्या कुटुंबात पडतील ती सर्व कामे करीत सर्वांची मर्जी राखणं हे तिचं जीवन! पण ती खचली नाही. "पांडुरंग माझा पिता। रखुमाई माझी माता"॥ हे नव नातं तिच्या भावजीवनात असलं होतं. नामदेव जनीपेक्षा थोडे लहान - पण त्यांच्या भक्तीचा तिच्यावर खूप प्रभाव पडला होता. तिने कायम स्वतःला नामयाची दासी म्हणून घेण्यात धन्यता मानली. ती पण विठ्ठलाच्या भक्तीत रंगून गेली. विठ्ठल नाम तिच्या अंतःकरणात इतके मुरले की दास्यत्वाकडून ती विठ्ठलाच्या सख्यत्वापर्यंत जाऊन पोहचली.

स्त्री जन्म म्हणुनी न व्हावे उदास।
साधुसंता ऐसे केले जनी॥
संतांचे घरची दासी मी अंकिली।
विठोबाने दिली प्रेमकळा॥

आपल्या प्रत्येक कामात जणु पांडुरंगच आपल्याला मदत करतो, अशी तिची ठाम भावना होती. आपल्या वाट्याला आलेले प्रत्येक काम ईश्वरार्पण बुध्दीने करावे, म्हणजे प्रारब्ध पुरे करण्याची संधी मिळते. घरातील प्रत्येक जण पांडुरंग स्वरूपच!! असे समजावे.

'ये रे ये रे माझ्या रामा। मनमोहन मेघश्यामा'
हे आर्त भावगीत हृदयाचा ठाव घेते. 'दळीता कांडीता तुज गाईन अनंता' या शब्दातील भाव इतका उत्कट आहे की; स्वतः पांडुरंग कामे करतांना मदत करतो यावर आपला विश्वास बसतो.

पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणी चारा ॥ या पध्दतीने पांडुरंग आपल्याला सांभाळतो ही जनाबाईची भावना होती. जनाबाईवर पुन्हा चोरीचा आळ आला होता. देव पुन्हा रात्री जनाबाईच्या घरी आले. गप्पा, दळण यात त्यांना तिथेच झोप लागली. पहाटे गडबडीत उठून जातांना त्यांच्या गळ्यातील हार तिथेच राहिला. देवाचा हार नाही, शेवटी रात्री जनाबाईचे दर्शनाला आली होती तिनेच तो चोरला, असा तिच्यावर आळ आला. तिला सुळी द्यायचे ठरले. पण देवाने जनीच्या आर्त हाकेला ओ दिली. सुळाचे पाणी झाले. जनीचा महिमा सर्वांनी मान्य केला. तिला निर्दोष ठरवण्यात आले.

त्यांचे (जनाबाईंचे) ३४७ अभंग सकल संतगाथेत समाविष्ट आहेत. समकालीन संतांबद्दल जनाबाईंना, मोठी आपुलकी वाटे. 'विठु माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा' या अभंगातून तर त्यांनी जाती व्यवस्थेवर प्रहार केला. वात्सल्य हा जनाबाईंच्या भक्तीचा अनन्यसाधारण विशेष होता.

इ. सन १३५० आषाढ वद्य त्रयोदशी शके १२७२ या दिवशी नामदेवांनी पांडुरंगाच्या पायरीपाशी चिरविश्रांती घेतल्यावर जनाबाईंनी पण त्याच दिवशी, तिथेच आपली जीवनयात्रा संपवली. आणि गुरुंच्या पाठोपाठ पांडुरंग चरणी लीन झाल्या. त्यांच्या चरणी कोटी कोटी प्रणिपात !!

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.

'संत जनाबाई'



